# हरभरा पिकावरील रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन


गोपाल केवटे
वैज्ञानिक अधिकारी
क्रॉपडेटा टेक्नोलॉजी प्रायवेट लिमिटेड

श्रुतिका भोयर
कृषि पदव्युत्तर पदवी विद्यार्थिनी (विस्तार शिक्षण विभाग)
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

आपल्या महाराष्ट्रात रब्बी हंगामात घेतल्या जाणाऱ्या कडधान्य पिकांपैकी हरभरा हे महत्वाचे पीक असून आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये हरभरा पासून बनलेल्या डाळ, डाळीचे पीठ, बेसन आणि इतर आहारामध्ये आपण योग्य घटक म्हणून त्याचा उपयोग करतो. महाराष्टात हरभरा लागवडीखालील क्षेत्र हे एकूण १.१२ दशलक्ष हेक्टर असून ०.८७ दशलक्ष टन त्याचे उत्पादन आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, हवामानातील बदल या बदलत्या निसर्ग चक्रामुळे हरभरा वर येणाऱ्या रोगामुळे पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन उत्पादनात मोठी घट होते. त्यासाठी रोगाचे वेळोवेळी योग्य नियंत्रण करणे आवश्यक असते.

### मर रोग:

लक्षणे:



मर हा रोग हा बुरशीजन्य रोग असून हा रोग फुस्यारियम ओक्सिस्पोरम बुरशीपासून होतो. ही बुरशी सहा वर्षापर्यंत जमिनीत वास्तव्य करते. पहिले प्रादुर्भावग्रस्त रोपांची कोवळी पाने आणि फांद्या सुकतात शेवटी संपूर्ण झाड वाळते. या रोगाचे प्रमुख लक्षण म्हणजे कोमेजलेल्या पानांचा रंग टिकून राहतो. या रोगामुळे पिकाचे १५ ते २० टक्केपर्यंत नुकसान होते.

उपाय:

१) पेरणीपूर्वी हरभरा बियाण्यास कार्बेन्डझिम २ ग्रॅम प्रति किलो बियाणे किंवा ट्रायकोडर्मा पावडर ५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बिजप्रक्रिया करावी.

२) रोग प्रतिकारक बियाणे जातीची लागवड करावी. (उदा: विजय, आयसीसीव्ही-१०, जॅकी-९२१८, विराट, विशाल).

### कोरडी मूळकुज:

लक्षणे:



कोरडी मूळकुज हा बुरशीजन्य रोग असून हा रोग रायझोक्टोनिया बटाटीकोला बुरशीपासून होतो. फुलोरा व घाटे भरतेवेळी पाण्याच्या कमीमुळे हा रोग होतो. रोगग्रस्त रोपांची वरील पाने व देठ पिवळा पडून झुकतात. त्यानंतर पाने गवती रंगाची होतात व रोपांची मुळे सडून जातात. रोपे उपटून पाहल्यास सहज निघून येतात व शेवटी संपूर्ण झाड राखाडी रंगाचे होते.

उपाय:

१) थायरम ३ ग्रॅम / किलो प्रमाणात बिजप्रक्रिया करावी.

२) रोगप्रतिकारक वाणांची पेरणी करावी.

३) पिकाची फेरपालट करून त्यास पाण्याचा ताण न देणे.

४) रोगग्रस्त झाडाचे अवशेष नष्ट करावेत.

### ओली मूळकुज:

लक्षणे:



हा बुरशीजन्य रोग असून हा रोग फुस्यारियम सोलेणी बुरशीमुळे होतो. जमिनीत आधिक ओलावा असल्यास या रोगाचा प्रादुर्भाव होतो. जास्त ओलावा असल्यास झाडाचे खोड व मुळे कुजतात. या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोपे बुटकी होतात, पाने पिवळी पडून वाढ खुंटते आणि रोपे उपटून पाहिल्यास मुळे कुजलेली दिसतात तसेच झाडाच्या सालीवर बुरशीची काळसर वाढ दिसून येते.

उपाय:

१) थायरम ३ ग्रॅम / किलो प्रमाणात बिजप्रक्रिया करावी.

२) रोग नियंत्रणासाठी भारी जमीन लागवडीसाठी टाळावी.

३) जमिनीत पाण्याचा निचरा उत्तम असावा, पिकात पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी.

४) रोगग्रस्त झाडाचे अवशेष नष्ट करावेत.

### करपा रोग:

लक्षणे:



हा बुरशीजन्य रोग असून हा रोग डीडमेला रेबीए या बुरशीपासून होतो. हा रोग साधारणतः थंड आणि ओल्या परिस्थिति मध्ये पसरतो. पानावर तसेच घाट्यावर लहान गोलाकार तपकिरी रंगाचे ठिपके दिसून येतात. रोगामुळे संक्रमित झालेल्या बियानांचा रंग फिकट होतो, बियाणे आकुंचित होतात तसेच सुकून किंवा वाळून जातात.

उपाय:

१) या रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५ ( ०.२५%) किंवा बाविस्टीन ( ०.१%) ची फवारणी करावी

२) रोगप्रतिकारक बियाणे छोटा काबुली, देशी हरभरा यांची पेरणी करावी.

३) प्रत्येक तीन वर्षाला पिकाची फेरपालटणी करावी

४) रोगग्रस्त झाडाचे अवशेष नष्ट करावेत.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ९८९००८६९०४)